प्रतिनिधी

# बालवाचकांसाठी वाचनकट्टा..

**बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिसतर्फे येत्या शनिवारी (१६ मे) संध्याकाळी ६ वाजता संस्थेत मुलांसाठी वाचनकट्टा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. मुलांमध्ये वाचनाची आवड जोपासण्यासाठी आयोजित या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाविषयी..**

नव्या युगात अगदी पहिलीतील मुलंसुद्धा गॅजेटचा वापर करताना दिसतात. गॅजेटचा वापर वाचन वाढविण्यासाठी उपयोग होऊ शकतो बरं का! लॅपटॉप, आयपॅड, टॅब ही उपकरणे पुस्तकवाचनासाठी उपयोगी ठरतील. 'ई-बुक'ही त्यातला एक चांगला पर्याय आहे. आजच्या मुलांना पुस्तके वाचण्याची आवड नसल्याची खंत नेहमी बोलून दाखवली जाते. त्यातून मराठी पुस्तकं वाचणे तर मुलांना कठीण आणि कंटाळवाणेही वाटते म्हणे. मराठीतही विपुल साहित्य आहे... जे वाचल्यावर मुलांना नक्कीच काहीतरी पुंजी गवसेल. त्यासाठी वाचनसंस्कृती रुजवणे गरजेचे आहे. वाचनाने आपल्याला आयुष्याची ठेव मिळते. पुस्तकवाचन हा एक आनंदाचा ठेवा होऊ शकतो. मुलांच्या हातात सातत्याने दिसणाऱ्या गॅजेट्सचा वापर गेम्स खेळण्याबरोबर वाचनाची गोडी लावण्यासाठीही करता येऊ शकतो. त्यासाठी 'ई बुक'चा पर्याय आहेच की..

**निमित्त**

मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजावी म्हणून 'बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहे. कदाचित एक दिवस मुलांना त्याचे महत्व पटूही शकेल; पण त्यासाठी पालकांनी आम्हाला साथ द्यायला हवी. मराठीत मोठ्या प्रमाणावर बालसाहित्य आहे. त्याचे वाचन केल्यास माहितीचा आणि कल्पकतेचा खजिनाच गवसेल. बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस आता नव्या रुपात येत असून, आमच्याकडे केवळ इंग्रजीच नव्हे तर, मराठी पुस्तकेही उपलब्ध आहेत. तिथे मुलांना पुस्तक चाळता येतात, वाचता येतील आणि आवडल्यास विकतही घेता येतील. पण फक्त इतकेच करून थांबण्यासाठी आम्ही हा डोलारा उभारला नाहीये तर, तेथील जागेचा वापर आम्हाला वाचन संस्कृती आणि मातृभाषेला खत, पाणी घालून पूर्वीची उर्जितावस्था प्राप्त करून देण्याचा प्रयत्न आहे. मराठीने स्वत:च्या कक्षा रुंदावल्या आहेत. विविधांगी पुस्तके हे त्याचेच द्योतक आहे. मराठी, इंग्रजी, हिंदी इतर भाषांमध्येही वाचनाचे वेड वाढावे, हा आमचा प्रयत्न आहे. वाढत्या नेटजालात गुरफटलेल्या मुलांना आणि पालकांना या खुल्या कार्यक्रमातून या आमच्या नव्या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करत आहोत. त्याची सुरुवात आम्ही करतोय बालक आणि पालकांसाठी असलेल्या एका कार्यक्रमातून...

बरं हा आम्ही फक्त आयोजित करतोय बरं का... याची सारी कल्पना आहे छोट्या दोस्तांची.. ज्यांना आपल्या मित्रांसाठी काहीतरी करायचे आहे. त्यामुळे आम्ही फक्त त्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या कल्पनेतून बहरलेल्या या कार्यक्रमात रेणू गावस्कर आपल्याशी गप्पा मारायला येणार आहेत. या छोट्या दोस्तांच्या पहिल्या प्रयत्नाला दाद द्यावी अशी आमची आणि या दोस्तांची अपेक्षा आहे. त्यासाठी त्यांची तयारी सुरू आहे.